सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

**आतितात्काळ / कालमर्यादा**

क्रमांक: पोमसं/३/११/६/निवडसुची (२०२६-२७)/पदो./७६/२०२६ मुंबई, दिनांक १६ सप्टेंबर, २०२६

**विषय: पोलीस उपनिरीक्षक (PSI), सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) व पोलीस निरीक्षक (PI) या संवर्गातील पदोन्नतीची कार्यवाही ३१ डिसेंबर २०२६ पूर्वी पूर्ण करण्याबाबत.**

* * *

**परिपत्रक**

दरवर्षी पोलीस उपनिरीक्षक (PSI), सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) आणि पोलीस निरीक्षक (PI) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचे प्रस्ताव सादर करताना होणाऱ्या विलंबामुळे पदोन्नती आदेश वेळेत निर्गमित करण्यात अडचणी येतात. या पार्श्वभूमीवर, प्रलंबित पदोन्नतीची संपूर्ण कार्यवाही यापुढे दिनांक ३१ डिसेंबर २०२६ पूर्वी पूर्ण करून पदोन्नती आदेश निर्गमित करण्याचे प्रस्तावित आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्त्वांनुसार पदोन्नती प्रक्रियेचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने, आढावा घेतला असता असे निदर्शनास आले आहे की, प्रामुख्याने खालील माहिती घटक घटकस्तरावर विहित वेळेत उपलब्ध न झाल्याने व त्यात त्रुटी असल्याने पदोन्नती प्रक्रियेस विलंब होतो:

१) गोपनीय अहवाल विहीत वेळेत न भरणे,
२) मालमत्ता विवरणपत्र विहीत मुदतीत सादर न करणे (Property Return),
३) भाषा परीक्षा सूट/उत्तीर्ण प्रमाणपत्राची नोंद सेवापूस्तकात न घेणे.

या सर्व प्रक्रियेची माहिती व अंमलबजावणीच्या दिशा-निर्देशांबाबत स्पष्टता आणण्यासाठी दिनांक ०८/०९/२०२६ रोजी व्हीसी (Video Conferencing) द्वारे सर्व घटक प्रमुखांना मार्गदर्शन करण्यात आले असून, त्याबाबतचे सविस्तर पत्र ७/९/२०२६ ला आधीच निर्गमित करण्यात आले आहे.

या सर्व प्रक्रियेची कालमर्यादेत व अचूक पूर्तता व्हावी यासाठी सर्व घटक प्रमुखांनी खालील सूचनांचे तंतोतंत पालन करावे:

**नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती:** पोलीस महासंचालक कार्यालयातील कार्यासन क्र. ९ च्या दिनांक १२/०१/२०२६ रोजीच्या पत्रान्वये गोपनीय अहवाल व पदकांची माहिती सादर करण्यासाठी नियुक्त केलेल्या नोडल अधिकाऱ्यांकडेच पदोन्नतीविषयक कामकाजाची अतिरिक्त जबाबदारी सोपवण्यात येत आहे. ज्या घटकातील नियुक्त नोडल अधिकाऱ्यांची बदली झाली असेल, त्या ठिकाणी तात्काळ 'पोलीस उपायुक्त / सहाय्यक पोलीस आयुक्त / पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय)' यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी. तसेच, नोडल अधिका-यांचे अद्ययावत **मोबाईल क्रमांक** आणि संबंधित घटकातील पोलीस निरीक्षक ते पोलीस उपनिरीक्षक यांचे **मोबाईल क्रमांक** पोलीस महासंचालक कार्यालयातील संगणक कक्ष compcell.dgoffice@mahapolice.gov.in या ईमेलवर क्र. पोमसं/संगणक कक्ष/पोलीस अधिकारी-मोबाईल क्र/११४/२०२६, दिनांक १६/९/२०२६ मध्ये विहीत केलेल्या नमुन्यात पाठवावे.

संबंधित घटकातील पदोन्नतीविषयक माहिती संकलित करणे आणि प्राप्त माहितीची अचूक पडताळणी करणे, तसेच संपूर्ण पडताळणी झालेली अचूक माहिती वेळेत या कार्यालयाकडे सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित नोडल अधिकाऱ्यांची राहील.

**माहितीची अचूकता व पडताळणी:** माहितीतील त्रुटींमुळे या कार्यालयाकडून पुनश्च विचारणा होऊन प्रक्रियेत नाहक विलंब होतो. त्यामुळे नोडल अधिकाऱ्याने संकलित केलेली संपूर्ण माहिती स्वतः घटक प्रमुखांनी तपासून व तिची सत्यता पडताळूनच सादर करावी.

तसेच या कार्यालयाचे कार्यासन क्र ३ यांचे क्रमांक पोमंसं/३/११/६/निवडसुची (२०२६-२७)/पदो./७६/२०२६, दिनांक २७/८/२०२६ आणि कार्यासन क्र ४ यांचे क्रमांक पोमसं/४/११/७/पोउनि ते सपोनि पदो./१०३/२०२६, दिनांक १०/९/२०२६ व दिनांक १६/९/२०२६ च्या परिपत्रकान्वये नमूद केलेले कालबध्द वेळा पत्रकाप्रमाणे नोडल अधिकाऱ्यांनी अचुक माहिती सादर करावी.

**पोर्टलचा वापर व कालमर्यादा:** माहिती जलद व पारदर्शक पद्धतीने प्राप्त व्हावी यासाठी नवीन वेब पोर्टल (Web Portal) तयार करण्यात येत आहे. सर्व मागवलेली माहिती या पोर्टलवर दिलेल्या कालमर्यादेनुसारच (Timelines) अपलोड करण्यात यावी.

विहित केलेल्या कालमर्यादेचे तंतोतंत पालन करून ३१ डिसेंबर २०२६ पूर्वी सर्व पात्र अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याच्या दृष्टीने घटक प्रमुखांनी सदर कार्यवाही प्राधान्याने व वेळेत पूर्ण करावी, ही विनंती.

**(सुप्रिया पाटील-यादव)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था / आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक / विशेष कृती / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई / मोटार परिवहन विभाग, पुणे / नक्षल विरोधी अभियान, नागपूर / सागरी सुरक्षा, मुंबई
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
सर्व पोलीस अधीक्षक
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते २०

**प्रत माहितीकरिता:**

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष

२. पोलीस उपअधीक्षक यांनी सदरहू परिपत्रक या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके या सदराखाली प्रकाशित करावे.